# महाराष्ट्र विधानसभा

**चौथे अधिवेशन, २०२२**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## शालेय शिक्षण विभागाच्या प्रशिक्षण शाखेतील DIET अधिव्याख्याता व कर्मचारी यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(१) ११३७७ (१३-०९-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाअंतर्गत असलेल्या प्रशिक्षण शाखेतील DIET अधिव्याख्याता व कर्मचारी यांचे वेतन प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२०मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात DIET या संस्था अस्तित्वात असून या संस्थामधून कार्यरत असलेल्या सुमारे ८८४ प्राचार्य ज्येष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता व कर्मचारी यांना माहे एप्रिल, २०२० पासून वेतन मिळालेले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिपक केसरकर (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासन स्तरावरुन वेळोवेळी प्रस्ताव सादर करण्यात येतो. केंद्र शासनाकडून पुरेसा व वेळेवर निधी प्राप्त होत नसल्याने निधी वितरणास विलंब होतो. त्यामुळे राज्य शासनाच्या तिजोरीतून वेतनावरील निधीची वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत प्रलंबित वेतन अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## कोरोना महामारीच्या काळात नियुक्ती केलेल्या शिक्षकांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत

**(२) २७५५७ (११-०६-२०२१). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध ठिकाणी आरोग्य यंत्रणांच्या मदतीसाठी नियुक्ती करण्यात आलेल्या सुमारे २१२ शिक्षकांचा मृत्यू झाला असतानाही त्यांच्या कुटुंबीयांना ५० लाखाचे सानुग्राह अनुदान न मिळाल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांच्या कुटुंबीयांना विनाविलंब ५० लाख सानुग्राह अनुदान, वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती आणि मृत शिक्षकांच्या कुटुंबातील एकाला अनुकंपा तत्वाअंतर्गत शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे आदी आशयाच्या मागणीचे निवेदन शिक्षक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे सादर केले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०९-१२-२०२२) :** (१) ते (३) शासन निर्णय, वित्त विभाग, दि.२९/०५/२०२० रोजी नुसार कोविड विमा पॅकेज अंतिम होऊन कार्यान्वित होईपर्यंत अंतरिम उपाययोजना म्हणून कोविड विषयक कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यु होणाऱ्या कर्मचाऱ्यांना रु. ५० लाखाचे सानुग्रह सहाय्य अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यामधील अटी व शर्ती नुसार शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करुन वित्त विभागाच्या मान्यतेनंतर मंजूर करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आयटी नगर (ता.मुळशी, जि.पुणे) परिसरातील अनधिकृत होर्डिंग वर कारवाई करणेबाबत

**(३) ३२३५० (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयटी नगर (ता.मुळशी, जि.पुणे) परिसरातील प्रामुख्याने मान, हिंजवडी, मारुंजी कासारसाई रस्त्याच्या कडेला प्रमुख चौकात शेकडो महाकाय होर्डिंग लावण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्याच्या पूर्व वादळी वाऱ्याने मोठ्या प्रमाणावर सदर अनधिकृत होर्डिंग कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने सर्व ग्रामपंचायतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे पत्राद्वारे संबंधित रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेल्या सर्व लोखंडी होर्डिंग लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर ग्रामपंचायत क्षेत्रातील अनधिकृत होर्डिंग काढण्याबाबतची मागणी पर्यावरण संस्था व नागरिकांकडून तहसीलदार कार्यालय मुळशी येथे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी आयटी परिसरातील मान, हिंजवडी, कासारसाई, मारुंजी या गावातील उभारण्यात आलेल्या रस्त्याकडील होर्डिंगकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग पीएमआरडीए, एमआयडीसी व ग्रामपंचायती व स्थानिक ग्रामपंचायती यांच्याकडून परवानगी घेण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व अधिकृत व अनधिकृत होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत तसेच अनधिकृत होर्डिंग उभारणाऱ्या जाहिरातदार एजन्सीवर शहर विद्रुपीकरण या गुन्ह्याखाली कारवाई करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

म.औ.वि. महामंडळाने विकसीत केलेल्या राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान उद्यान येथील हिजंवडी क्षेत्राच्या हद्दीमध्ये महाकाय होर्डिंग नाहीत.

तथापि, मऔवि महामंडळाने हिंजवडी माहिती व तंत्रज्ञान उद्यान क्षेत्रामध्ये रस्त्याच्या बाजूने व विद्युत खांबावर छोट्या जाहिरातींचे फलक लावण्याकरीता व रस्त्यावर ६ कमानी उभारण्याकरीता परवानगी दिली आहे. त्यापैकी २ कमानी काढून टाकण्यात आलेल्या असून, सध्या ४ कमानी अस्तित्वात आहेत.
(४) राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान उद्यानातील माण, हिंजवडी, कासारसाई, मारुंजी या गावांमध्ये होर्डिंग लावण्याकरीता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कडून परवानगी देण्यात आलेली नाही.

तसेच मऔवि महामंडळाने हिंजवडी माहिती व तंत्रज्ञान उद्यान क्षेत्रामध्ये रस्त्याच्या बाजूने व विद्युत खांबावर छोट्या जाहिरातींचे फलक लावण्याकरीता व रस्त्यावर ६ कमानी उभारण्याकरीता परवानगी दिली. त्यापैकी २ कमानी काढून टाकण्यात आलेल्या असून, सध्या ४ कमानी अस्तित्वात आहेत.
(५) मऔवि महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात, मऔवि महामंडळाच्या परवानगीने उभारण्यात आलेल्या जाहिरात फलक/ कमानीच्या सुरक्षिततेबाबत दोन एजन्सीजपैकी, एका एजन्सीने स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी प्रमाणपत्र सादर केले आहे. तर, दुसऱ्या एजन्सीने उभारलेल्या कमानी सुरक्षित व सुस्थितीत आहेत.

तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) त्यांच्या क्षेत्रातील रस्त्यांलगत असलेल्या हॉर्डिंगचे सर्व्हेक्षण करुन पुढील योग्य ती कार्यवाही करणार आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुना शिक्षण संस्था द्वारा संचलित महर्षि विद्यामंदिर (पिंपरी) येथील शिक्षकांच्या होत असलेल्या आर्थिक शोषणाबाबत**

**(४) ३२३८८ (२३-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड शहर येथील पुना शिक्षण संस्था द्वारा संचलित महर्षी विद्यामंदिर हिंदी प्राथमिक स्कूल, श्रीनगर, रहाटणी, पुणे-१७ येथे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या अनुदानासाठी शैक्षणिक सत्र २०११-१२ मध्ये झालेल्या मूल्यांकनात सदर शाळा २० टक्के अनुदानासाठी पात्र ठरली असून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी इतर शासकीय अनुदान सुविधा- मोफत पुस्तक, शालेय पोषण आहार योजना सुरु केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पुना शिक्षण संस्था द्वारा संचलित महर्षी विद्यामंदिर हिंदी प्राथमिक स्कूल,श्रीनगर, रहाटणी या कार्यरत असलेल्या आणि वैयक्तिक मान्यता प्राप्त शिक्षकांचे शासकीय नियमानुसार वेतन दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शाळेच्या संस्थापकाने त्यांच्या मुलीच्या स्वप्नील धर्मराज पाल शिक्षण पदविका पूर्ण करून वैयक्तिक मान्यता काढावयाची असल्याने सदर शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांना शासकीय नियमानुसार वेतन न देता फक्त दोन ते तीन हजार रुपये इतके अल्प मानधन अदा करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहर येथे पुना शिक्षण संस्था द्वारा संचलित महर्षी विद्यामंदिर हिंदी प्राथमिक स्कूल, श्रीनगर, रहाटणी या शाळेस १०० टक्के शासकीय अनुदान प्राप्त होत असूनही शाळेतील शिक्षकांचे शासकीय नियमांनुसार सेवेप्रमाणे वेतन मिळणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.सदर शाळेस १०० टक्के अनुदान अद्यापि प्राप्त झालेले नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई शहरातील सर्व्हिस रोड मुख्य रस्त्यांवर वाहतुक कोंडी होते असल्याबाबत.**

**(५) ३२४९० (१२-०१-२०२२). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-बेलापूर (नवी मुंबई) मार्गाच्या बाजूला डीएकेसी ते लोकमत (महापे) तसेच सविता केमिकल (तुर्भे) याठिकाणी सर्व्हिस रोडला लागून असलेल्या भूखंडाची विक्री एमआयडीसीने केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी उभारण्यात आलेल्या या जागांवर हॉटेल व इतर व्यवसायामुळे येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनांना पार्किंग नसल्यामुळे सदरची सर्व वाहने सर्व्हिस रोडवरच उभी केली जात असल्यामुळे त्याठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी होते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील मुख्य रस्त्यांवर अनेकदा वाहतुक कोंडी होते त्यामुळे रुग्णवाहिका, अग्निशमन दलाच्या गाड्या, स्कुल बस इत्यादी आपत्कालीन सेवेतील वाहनांना अशा वेळी हे सर्व्हिस रोड उपयुक्त ठरतात तसेच मुख्य रस्त्यावर काही दुर्घटना घडल्यास अथवा समस्या निर्माण झाल्यास पर्यायी रस्ता म्हणून देखील याचा उपयोग होतो हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एमआयडीसीने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व्हिस रोडला लागून असलेल्या जागेची होत असलेली विक्री तात्काळ थांबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर २०२१ मध्ये मा. मुख्यमंत्री,. उपमुख्यमंत्री, उद्योग मंत्री, . उद्योग राज्य मंत्री, प्रधान सचिव उद्योग विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी (महापे, नवी मुंबई) यांना लेखी निवेदने सादर केली आहेत हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुख्य रस्त्यांवर वाहतुक कोंडी होते असल्यामुळे सामान्य नागरिकांना झालेल्या त्रास कमी करण्यासाठी तसेच निवेदनाच्या अनुषंगाने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर ठिकाणी डीकेसी ते लोकमत (महापे ) या सर्व्हीस रोडवर सरस लॉजींग बोर्डींग व सुयोग हॉटेल या दोन अस्थापना असून त्यांचेकडे वाहन पार्क करण्याची व्यवस्था आहे.
(३) व (४) हे खरे आहे
(५) नवी मुंबई वाहतूक शाखे कडून मुख्य रस्त्यावर ठाणे-बेलापूर रोडवर वाहतूक कोंडी होऊनये म्हणून सतर्कता बाळगली जाते.जर कुठे वाहतूक कोंडी झाली असेल अथवा अडथळा निर्माण झाला असेल अशा वाहनांवर मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई केली जाते.सदर सर्व्हीस रोड वरील संबंधीत अस्थापनांना ११९ प्रमाणे नोटीस देण्यात आलेली आहे.तसेच रस्त्यावर पार्क केलेली वाहने आढळून आल्यास मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयात आधार लिंकमध्ये बोगस विद्यार्थी आढळल्याबाबत

**(६) ३२७७१ (१२-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद, नांदेड जिल्हयात आधार लिंकमध्ये बोगस विद्यार्थी आढळले असल्याचे दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवून शिक्षकांची पदे वाचविण्यासाठी संस्था चालकांनी गैरकारभार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सरल प्रणाली अंतर्गत दुबार नोंद झालेल्या विद्यार्थ्यांची पडताळणी करून आवश्यक दुरूस्त्या करण्याचे निर्देश शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २२.९.२०२१ च्या पत्रान्वये सर्व विभागीय संचालकांना दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत

**(७) ३३३३१ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विनाअनुदान, अंशतः अनुदान शाळा किंवा तुकडीवर नियुक्त व त्यानंतर १०० टक्के अनुदान मिळालेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी निवृत्ती वेतन योजना मिळणेची शिफारस करणेबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जुलै,२०२१ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०९-१२-२०२२) :** (१) व (२) विषय साधर्म्य असलेले दि.०६/०७/२०२१ रोजीचे पत्र प्राप्त आहे.

वित्त विभागाने दि.३१/१०/२००५ च्या निर्णयान्वये दि.०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे. सदर योजनेची विस्तृत कार्यपद्धती शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दि.२९/११/२०१० च्या शासन निर्णय अन्वये निश्चित केली आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.२९/११/२०१० रोजीच्या शासन निर्णयास आव्हानित केले असून मा.न्यायालयाच्या पुर्णपिठाने दि.३०/०४/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयान्वये सदर शासन निर्णय न्यायोचित ठरविले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर अतिक्रमण केल्याबाबत

**(८) ३३५१४ (१२-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि. ठाणे) तालुक्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंबरनाथ पूर्व विभागातील जागेवर भूमाफिया मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करून गाळे व चाळींचे बांधकाम केल्याचे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,चौकशीत काय निष्पन्‍न झाले तसेच अतिक्रमण करून बांधकाम करणाऱ्या भूमाफिया व त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३). नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष ग्रामीण (अल्पसंख्यांक मोर्चा )भारतीय जनता पार्टी यांचे कडून प्राप्त झालेल्या दिनांक ०९.०९.२०२१ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने उपरोक्त परिसराचे सर्वेक्षण करून सिमांकन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

अंबरनाथ पूर्व भागातील म.औ.वि.महामंडळाचा भूखंड क्र.आरएच १, क्षेत्रफळ १०२००१ चौ.मी.मे.निसर्ग निर्माण यांना दि.१३.०५.२०१४ रोजी गृहनिर्माण प्रकल्पासाठी वितरीत करण्यात आला आहे.सदर भूखंडाच्या आजूबाजूचा परिसर अतिक्रमण प्रवण आहे.सदर परिसराचे संयुक्त सर्वेक्षण करून सिमांकन करण्याची कार्यवाही सुरू आहे.सिमांकन केल्यानंतर म.औ.वि.महामंडळाच्या जागेवर अतिक्रमण आढळल्यास,सदरचे अतिक्रमण शासनाच्या नियमावलीनुसार तातडीने निष्कसित करण्याची कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इगतपूरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील विस्थापितांना आणि प्रकल्पबाधित स्थानिकांना या औद्योगिक क्षेत्रात् कायमस्वरुपी नोकरी मिळणेबाबत

**(९) ३४१७२ (१२-०१-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील अनेक गावांमध्ये मोठयाप्रमाणात एमआयडीसीची औद्योगिक वसाहत असून येथील रहिवाशांची एमआयडीसीच्या औद्योगिक क्षेत्रात जमीन संपादित झालेले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विस्थापितांना आणि प्रकल्पबाधित स्थानिकांना या औद्योगिक क्षेत्रात् कायमस्वरुपी नोकरी नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक प्रकल्पबाधितांना तात्काळ या एमआयडीसीच्या औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये नोकरीत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२९-११-२०२२) :** (१) हे खरे नाही,

इगतपूरी-त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) या तालुक्यातील गावांमधील जमीनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादित करण्यात आलेल्या नाहीत. तसेच सदर तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक वसाहत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत उद्योगांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) ३५३३० (१२-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहत टप्पा दोन येथे पायाभूत सुविधांचा अभाव व जमिनीचे प्रचंड दर यामुळे १४०० हेक्टर जमीन औद्योगिक वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे उद्योग उभारणीसाठी उद्योगांना पायाभूत सुविधा व जमिनीचे दर कमी करण्यासाठी शासनाने कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०२-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक वसाहत टप्पा-२ करीता १८५.० हे.आर जागेचे भूसंपादन केले असून या औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा, जसे डांबरी रस्ते,जलवाहीनी व पथदिवे, पुरविण्यात आल्या आहेत. या औद्योगिक क्षेत्रात १५३ भूखंडाचे आरेखन करण्यात आले.माहे मे २०२१ पर्यंत ३६ भूखंडाचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी २ भूखंडावर उत्पादन सुरू आहे व ४ भूखंडांवर बांधकाम सुरू आहे.

अतिरीक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्राकरीता १३१४.०७ हे.आर जागेचे संपादन करण्यात आले असून पायाभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.या क्षेत्रामध्ये १६ द.ल.ली.प्रती दिन पाणीपुरवठा वरून प्रती दिन ७० द.ल.ली. प्रती दिन पाणीपुरवठा कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. प्रती दिन ५.०० द.ल.ली. क्षमतेचे सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणीचे काम सुरू आहे तसेच सबस्टेशनसह विद्युत वाहिनीचे जाळे टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या क्षेत्रात २७५ भूखंडाचे आरेखन करण्यात आलेले आहे.आरेखित भूखंडापैकी एकूण ११६.७८ हे.आर भूखंडाचे क्षेत्र वाटप करण्यात आले असून ६४.०० हे.आर क्षेत्राच्या भूखंड वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

बुटीबोरी औद्योगिक क्षेत्राचा परिसर लक्षात घेता सदर ओद्योगिक क्षेत्रातील दर वाजवी आहेत. सद्यस्थितीत सदर औद्योगिक क्षेत्रात रिक्त भूखंड ऑनलाईन पद्धतीने वाटप करण्याचे महामंडळाचे धोरण असून गुंतवणूकदारांना सदर औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी नेहमीच प्रोत्साहित केले जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दहावी व बारावीच्या परीक्षा रद्द झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत करण्याबाबत

**(११) ३५६१५ (१२-०१-२०२२). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहावी व बारावीची परीक्षा रद्द झाल्यामुळे परीक्षांसाठी विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेले परीक्षा शुल्क परत देण्यात यावे अशी मागणी पालकांकडून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परीक्षांसाठी अभ्यासक्रमाप्रमाणे विद्यार्थ्यांकडून ४०० ते ५२० रुपयांपर्यंत शुल्क आकारण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या परीक्षेसाठी दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात आलेली अनुक्रमे रुपये ६० व ५० कोटी शैक्षणिक शुल्काची रक्कम मंडळाने अद्यापही विद्यार्थ्यांना परत केलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :**(१) होय.
(२) अंशत: खरे आहे. राज्य मंडळाकडून इ.१० वी परीक्षेसाठी किमान परीक्षा शुल्क रु.४०५/- व इ.१२ वी परीक्षेसाठी किमान परीक्षा शुल्क रु.४४५/- आकारणी केले जाते.
(३), (४) व (५) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने अध्यक्ष, राज्यमंडळ यांनी घेतलेल्या निर्णयानुसार फेब्रुवारी-मार्च २०२१ च्या परीक्षेसाठी नोंदणी झालेल्या इ.१० वी व इ.१२ वी च्या एकूण विद्यार्थ्यांपैकी पात्र विद्यार्थ्यांना शाळांनी नोंदविलेल्या मागणीनुसार शुल्काचा परतावा मंडळाकडून करण्यात येत आहे. दिनांक १३.०६.२०२२ अखेर मागणी नोंदविलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांची रु.१२.१८ कोटी इतक्या रकमेचा संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना परतावा करण्यात आला आहे. उर्वरित विद्यार्थ्यांना शाळांच्या मागणीनुसार परतावा करण्याची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येत आहे.

---

## कोरोनाच्या महामारीत सोने-चांदीच्या व्यवसायामध्ये कमालीची घट झाल्याबाबत

**(१२) ३६२१२ (१२-०१-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना महामारीत सोने-चांदीच्या व्यवसायामध्ये कमालीची घट झाल्याने मोठया प्रमाणात दागिन्यांसाठी साचे (डाय) घडवणाऱ्या कुशल डायमेकर्स व्यावसायिकांचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील समुद्र किनारपट्टी भागात चिंचणी ते धाकटी डहाणू या परिसरामधील सुमारे २० गावात मागील शतकापासून परंपरागत डायमेकिंगचा व्यवसाय पिढयानपिढया सुरू आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, जिल्हा उद्योग केंद्रामार्फत या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक वेळा बैठका व चर्चा करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०५-१२-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) पालघर जिल्ह्यामध्ये ज्वेलरी डाय मेकिंग करणाऱ्या एकूण ७०३ उद्योग आधाराची नोंदणी झालेली आहे. त्यांची एकूण गुंतवणूक रुपये ३८.९९ कोटी इतकी असून त्यापासून एकूण २,७३९ एवढा रोजगार निर्माण झालेला आहे. करोना महामारीत सोने-चांदीच्या व्यवसायामध्ये कमालीची घट झाल्याने मोठ्या प्रमाणात दागिन्यांसाठी साचे (डाय) घडवणाऱ्या कुशल डायमेकर्स व्यावसायिकांचे नुकसान झाल्याबाबत कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झालेली नाही. तथापि, सदर व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, पालघर मार्फत बैठका घेण्यात आलेल्या आहेत. राज्यामध्ये मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, सुधारित बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना इत्यादी योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी डहाणू येथील उद्योजकांना जिल्हा उद्योग केंद्र, पालघर मार्फत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या ४२ अर्जांपैकी ७ लाभार्थ्यांचे एकूण रुपये ११०.२५ लाख प्रकल्प किमतीचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या ३९ अर्जांपैकी २४ लाभार्थ्यांना एकूण रुपये २७३.७५ लाख प्रकल्प किमतीचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. तसेच सुधारित बीज भांडवल योजनेंतर्गत ४ लाभार्थ्यांना रुपये ३६.७१ लाख इतक्या प्रकल्प किमतीचे कर्ज मंजूर करण्यात येऊन रुपये ७.३४ लक्ष बीज भांडवल वाटप करण्यात आले आहे. सन २०२१-२२ मध्ये उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत डायमेकिंग प्रशिक्षण कार्यकम घेण्यात आला आहे. तसेच जिल्हा उद्योग केंद्र, पालघर मार्फत दरवर्षी पालघर जिल्ह्यातील सुक्ष्म व लघु उद्योगांना जिल्हा उद्योग पुरस्कार देण्यात येतात.

---

## ठाणे जिल्हयातील कल्याण भिवंडी औद्योगिक (MIDC) क्षेत्रातील राखीव भूखंडाचे बेकायदेशीरपणे औद्योगिक भूखंडात रुपांतर केल्याबाबत

**(१३) ३६४५३ (१२-०१-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-कल्याण (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) क्षेत्रातील AM-५ च्या सोई-सुविधेसाठी राखीव असलेल्या भूखंडाचे औद्योगिक भूखंडात रुपांतरण करण्यात येऊन, उक्त भूखंड रासायनिक कंपनीला वाटप करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडापासून १५० फुट अंतरावर मुकबधीर विद्यार्थ्यांची शाळा व दाट लोकसंख्येचे गाव असून, उक्त भुखंडाचे औद्योगिक क्षेत्रात रुपांतर करतांना कार्यकारी अभियंता ह्याचा स्थळप्रत पाहणी अहवाल न घेता तसेच DCR प्रमाणे मंत्रिमंडळाची परवानगी देखील घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिपत्र क्र.मऔविम/ भूविभाग /D१४५४० दि.२६/०९/२०१६ अन्वये ज्या औद्योगिक क्षेत्रात आरेखित भूखंड / भूखंड वाटपाच्या क्षेत्राच्या ८०% क्षेत्राचे वाटप पूर्ण झाले असून तेथील उर्वरित भूखंड वाटप हे ई-निविदा प्रक्रियेने करण्यात यावा असा स्पष्ट आदेश असताना टेंडरिंग न करता भूखंडाचे वाटप केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०२-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार औद्योगिक क्षेत्राचे सुविधा क्षेत्र किमान ठेवण्याच्या मर्यादेपेक्षा जास्त असल्याने सदर क्षेत्र रूपांतरीत करून म. औ .वि. महामंडळाच्या दि.०६.०१.२०१२ च्या तत्कालीन धोरणानुसार भूखंड वाटप समितीने दि.२०.१०.२०१३ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार भूखंड वाटप करण्याबाबत निर्णय घेऊन दि.०६.०८.२०१४ रोजी देकारपत्र दिले आहे. .

(२) हे खरे नाही.
सदर भूखंडामधून ग्रामस्थांची वहीवाट आहे.सदरची वहीवाट पुर्ववत ठेवण्याबाबत ग्रामस्थांच्या मागणीनुसार महामंडळाच्या एमएमसी च्या बैठकीमध्ये भूखंड क्र.१६ मधून रस्त्याचे आरेखन केले आहे.
(३) रासायनीक कंपनीला ५००० चौ.मी.क्षेत्राचा भूखंड वाटप करण्याचा निर्णय हा भूमी वाटप समितीच्या दि.२३.१०.२०१३ रोजीच्या बैठकीत तत्कालीन दि.०६.०१.२०१२ रोजीच्या धोरणानुसार घेण्यात आला असून दि.०६.०८.२०१४ रोजीच्या देकारपत्रान्वये कळविण्यात आलेल्या भूखंडाच्या अधिमुल्याच्या रकमेचा भरणा केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

**सोलापूर - अक्कलकोट महामार्गावर अपघातात होत असलेली वाढ**

**(१४) ३६५६५ (१७-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर - अक्कलकोट महामार्ग नादुरुस्त व अतिक्रमण झाल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तसेच सोलापूर अक्कलकोट महामार्गाची दुरुस्ती करुन अतिक्रमणे हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, तडवळ ते सुलेरजवळगे-सोलापूर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अनेक वर्षापासून रखडले असून अक्कलकोट ते सिंदखेड ह्या रस्त्याचे काम मंजूर असूनही अद्यापही कामास सुरुवात सुरुवात झाली नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रस्त्याची कामास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत तसेच प्रलंबित रस्त्याची कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही .
अक्कलकोट-सोलापूर चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारित असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.
(२) सद्यस्थितीत सोलापूर अक्कलकोट महामार्गावर अतिक्रमण अस्तित्वात नाही व वेळोवेळी झालेले अतिक्रमण ज्या त्या वेळी स्थानिक प्रशासन व प्राधिकरणामार्फत हटविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) मौ. तडवळ ते सुलेरजवळगे व अक्कलकोट ते सिंदखेड रस्ता जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असून सदर रस्त्याबाबत ग्राम विकास विभागाकडून पुढीलप्रमाणे माहिती कळविण्यात आली आहे.
१) मौ.तडवळ ते सुलेरजवळगे या ७ कि.मी.रस्त्याचे काम १३ वर्षापूर्वी मा.प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत झाले असून सदर कामाचा देखभाल दुरुस्ती कालावधी पूर्ण झाला आहे. सदर ७ कि.मी. लांबीचा संपूर्ण रस्ता डांबरी पृष्ठभागाचा असून संपूर्ण रस्ता खराब झाला आहे.सदर रस्ता दुरुस्तीसाठी निधी मंजूर असून सदर रस्ता दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे.
२) मौ.अक्कलकोट ते सिंदखेड या एकूण ८ कि.मी.रस्त्याचे काम १३ वर्षापूर्वी मा.प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत झाले असून सदर कामाचा देखभाल दुरुस्ती कालावधी पुर्ण झाला आहे. सदर रस्त्यावर या विभागाअंतर्गत ३०५४ किंवा अन्य योजनेतून कोणतेही दुरुस्तीचे काम या वर्षी मंजूर नाही.
(४) निधी उपलब्धते नुसार दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत आहे.
(५) निधी उपलब्धते नुसार दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत आहे.

---

**धुळे जिल्ह्यातील अनुदानित शाळेतील शिक्षकांचे मासिक वेतन निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(१५) ३७९६१ (३१-०३-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे मासिक वेतन निधी अभावी मागील चार महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

सन २०२०-२१ पासून संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यामुळे प्रत्येक महिन्यांकरिता वेतन व इतर बाबींसाठी आवश्यक असणारा निधी मर्यादित मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. धुळे जिल्ह्यात माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२१ मध्ये वेतन अनुदान उपलब्ध अदा करण्यात आले नव्हते. शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून दिनांक २४/१/२०२२ रोजी वेतन अनुदान उपलब्ध झाल्यानंतर धुळे जिल्ह्यातील अंशत: अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन दिनाक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा ) येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेचा विस्तार करण्याबाबत**

**(१६) ३७९८९ (०९-०४-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि. बुलढाणा) येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या जागे ऐवजी अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी सुटाळा तालुका खामगाव येथे २५४.४६ हेक्टर.आर खाजगी क्षेत्र संपादन करण्याची प्रक्रिया सुरू आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिनियम १९६१ प्रकरण -६ ची अधिसूचना दिनांक ३ मार्च २०१६ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे हे खरे आहे का,

(३) असल्यास, संपादन करावयाच्या क्षेत्राची संयुक्त मोजणीचे काम पूर्ण झाले आहे हे ही खरे आहे का,

(४) असल्यास, कलम ३२(२) ची कारवाई उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत सुरू आहे, तसेच याबाबत तात्काळ कारवाई पूर्ण करण्याबाबत संबंधिताना आदेशित करणार आहेत काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) :** (१) व (२) होय,हे खरे आहे

(३) प्रथम टप्यात संपादीत करावयाच्या १९५.४५ हे आर क्षेत्राची संयुक्त मोजणी पुर्ण झाली आहे

(४) संयुक्त मोजणीनुसार सदर क्षेत्रातील ३३.७० हे.आर क्षेत्रावर जिगांव प्रकल्पाचे आरक्षण असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर आरक्षण इतरत्र हालविणेबाबतची कार्यवाही महसूल विभाग,बुलडाणा व म.औ.वि.महामंडळ यांचे समन्वयाने सूरू आहे.आरक्षण हालविणेबाबत निर्णय झाल्यानंतर ३२ (२ ) ची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परीक्षा परिषदेचे अस्तित्व अबाधित राहण्याबाबत

**(१७) ३८१५२ (३१-०३-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या परीक्षा परिषदेतर्फे शिष्यवृत्ती परीक्षा, टीईटी परीक्षा, टायपिंग परीक्षा, डी.एड. आदी परीक्षा घेतल्या जात असून त्यातील काही परीक्षा एजन्सीकडून घेतल्या जातात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाचवी ते आठवीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती परीक्षेसाठी खुल्या व ओबीसी संवर्गासाठी शुल्क आकारले जाते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टीईटी परीक्षा, टायपिंग परीक्षांच्या माध्यमातून परिषदेकडे निधी जमा होत असून गेल्या वीस वर्षात घेण्यात आलेल्या विविध परिक्षांमधून परिषदेकडे कोट्यवधी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या आहेत, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, शिष्यवृत्ती परीक्षेमुळे एका विद्यार्थ्यामागे १६० ते १०० रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याने बालचित्रवाणीप्रमाणे राज्य परीक्षा परिषदही बंद पडण्याची शक्यता असल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे ीरखरे आहे काय,

(५) असल्यास, राज्य परीक्षा परिषद स्वायत्त संस्था असूनही गेल्या काही वर्षापासून परिषदेच्या कामकाजात राजकीय हस्तक्षेप वाढला असुन परिषदेमार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षा खाजगी एजन्सीकडे दिल्या जात असल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्य परीक्षा परिषदेचे अस्तित्व अबाधित राहण्यासाठी दुसऱ्या खाजगी एजन्सीला परीक्षेचे काम न देण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :**(१), (२) व (३) परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांकरीता वेळोवेळी शासन निर्णयांव्दारे विहीत केल्यानुसार परीक्षा शुल्काची आकारणी करण्यात येते.

(४) व (५) हे खरे नाही.

(६) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, अधिनियम, १९८८ मधील तरतुदी तसेच प्रचलित शासन धोरणानुसार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून परीक्षांचे आयोजन करण्यात येते.

---

## इयत्ता सहावी ते आठवी तुकडयांना शिकविणाऱ्या प्रशिक्षीत शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणीतून डावलण्यात येत असल्याबाबत

**(१८) ३८३११ (०१-०४-२०२२). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण अधिनियम २००९ नुसार साधारणत: सन २०१४ पासून इयत्ता सहावी ते आठवी करीता प्रशिक्षीत शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून सदर शिक्षकांपैकी फक्त एक तृतीयांश पदांनाच पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १२ ते १५ जिल्ह्यात (पुणे, कोल्हापूर, बीड, गोंदिया व इतर) मात्र सहावी ते इयत्ता आठवी ला शिकविण्याऱ्या सर्व विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे व इतर जिल्ह्यांना मात्र पदवीधर वेतनश्रेणी पासून डावलले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन परिपत्रक क्र. वेतन १२१६/प्र.क्र./१२३/१६/टी एन टी-३ दि. ३ ऑक्टोबर, २०१६ मध्ये "एक तृतीयांश पदांनाच पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू राहील" ही तरतूद रद्द करुन १००% पदांना पदवीधर विषय शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत खरे आहे.
(३) उच्च प्राथमिक (इ. ६वी ते ८ वी) वर्गांवर नियुक्त शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दि. २७/०६/२०२२ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिति गठीत करण्यात आली असून, समितीच्या अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बारवी (जि.ठाणे) धरणामुळे बाधित झालेल्या गावांचे आणि आदिवासी वाडयांचे विस्थापन करताना केलेला गैरव्यवहार

**(१९) ३८५५१ (२५-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती आणि औद्योगिक क्षेत्राला पाणी पुरवठा करणाऱ्या तालुक्यातील बारवी धरणामुळे बाधित झालेल्या गावांचे आणि आदिवासी वाडयांचे विस्थापन करतेवेळी स्थानिक पुढाऱ्यांच्या संगनमताने धरणग्रस्तांना फसवून अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केला असल्याने एमआयडीसी प्रशासनाविरुद्ध धरणग्रस्त महिलांनी तहसिलदार कार्यालयासमोर माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान उपोषण सुरू केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उपोषणकर्त्यांच्या मागण्या काय आहेत, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) :** (१) बारवी धरणामुळे बाधित झालेल्या मोहघर-१, काचकोली, जांभूळवाडी, सुकाळवाडी येथील प्रकल्पग्रस्तांनी दि. २५/०१/२०२२ रोजी उपोषण करण्याबाबत तहसिलदार, मुरबाड यांच्याकडे परवानगी मागण्यात आली होती. तथापि, तहसिलदार, मुरबाड यांचे पत्र क्र. महसूल / फौजदारी/ वशी/ कावि/ ४१२२ दि.१८/०१/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे कोव्हिड विषाणूचा प्रादुर्भाव पहाता, विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक कायदा, ठाणे जिल्ह्यात लागू केल्याने उपोषण रद्द करावे, अशी विनंती करण्यात आली होती. त्यानुसार सदर उपोषण रद्द करण्यात आले.
(२) प्रकल्पबाधीतांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे खालील मागण्या केल्या आहेत.
प्रकल्पबाधीतांना नोकऱ्या मिळणे, घरे बांधण्यासाठी जागेचे सपाटीकरण करणे, घरे बांधताना पाणीपुरवठा मिळणे, जुनी घरे मोडल्यानंतर नवीन जागेवर जाण्यासाठी वाहतुक खर्च मिळण्याबाबत, दफन भूमीच्या जागेबाबत, अनुदानाची रक्कम मिळणेबाबत,खावटी रक्कम मिळणेबाबत, नविन समाज हॉल बांधणेबाबत, शौचालयाबाबत, संपादित जमिनीचा चालू बाजार भावाप्रमाणे फरक मिळणेबाबत इत्यादी.वरील मागण्याबाबत, म. औ. वि. महामंडळाच्या स्थानिक कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत पत्र क्र. ए २४८४२, दि.२०/०१/२०२२ अन्वये संबंधीतांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पाली ( जि. ठाणे ) येथील जमिन मिळकतीबाबत

**(२०) ३८६५३ (०९-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१). मौजे पाली ( जि. ठाणे ) येथील जमिन मिळकतीबाबतीत राज्य शासन आणि राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत १०५.५७९ हे.आर.एवढे खाजगी क्षेत्र तसेच १.२० हे.आर. एवढे सरकारी क्षेत्रात होऊन घातलेल्या औद्योगिक क्षेत्रास तसेच भूसंपादनास विरोध करण्याबाबत गाव बचाव संघर्ष समिती, पाली यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान विनंती अर्ज दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अर्जाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) गाव बचाव संघर्ष समिती, पाली यांच्या दि.२२.११.२०२१ रोजीच्या निवेदनानुसार त्यांनी प्रस्तावीत भूसंपादनास विरोध दर्शविला आहे.त्यानुषंगाने शासन स्तरावरून भूसंपादन प्रक्रिया पुर्ण करणेकामी गाव बचाव संघर्ष समिती, पाली यांच्या निवेदनातील मुद्यांबाबत सारासार माहिती घेऊन,त्यांना प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती देऊन तसेच त्यांची संमती प्राप्त करून पुढील भूसंपादन कार्यवाही म.औ.वि.महामंडळामार्फत करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## अमेरिकेतील विद्युत कार उत्पादक '' टेस्ला '' या कंपनीस राज्यात प्रक्रिया उभारण्याबाबत विनंती केल्याबाबत

**(२१) ३८८१९ (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमेरिकेतील विद्युत कार उत्पादक '' टेस्ला '' या कंपनीस राज्यात प्रक्रिया केंद्र उभारण्याची विनंती जलसंपदा मंत्री यांनी जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-१२-२०२२) :** (१) नाही. हे खरे नाही.
अमेरिकेतील विदयुत कार उत्पादक "टेस्ला" या कंपनीस राज्यात प्रक्रिया केंद्र उभारण्याची विनंती जलसंपदा मंत्री यांनी जानेवारी,२०२० वा त्यादरम्यान केल्याबाबतची कोणतीही माहिती उद्योग विभागास प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाने माध्यमिक शाळांमधून मंजूर केलेल्या आयटीसी प्रयोगशाळा उभारणीच्या कार्यात झालेल्या दिरंगाईबाबत

**(२२) ३८९७३ (०१-०४-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने माध्यमिक शाळांमधून मंजूर केलेल्या आयटीसी प्रयोगशाळा उभारण्याच्या कामात निष्काळजीपणा केल्याने एकुण रु.१.२५ कोटीचा निधी शिल्लक असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी समग्र शिक्षा अभियान कक्षाच्या प्रकल्प संचालकांनी हिंगोलीचे शिक्षणाधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :**(१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) हिंगोली जिल्ह्यातील मंजूर शाळांमध्ये संगणकीय साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद हिंगोली यांनी विहित प्रक्रियेचा अवलंब करून दिनांक २.३.२०२२ च्या पत्रान्वये पुरवठा आदेश निर्गमित केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोईसर येथील तारापूर औद्योगिक वसाहतीमधील रस्त्यांच्या झालेल्या दुरवस्थेबाबत**

**(२३) ३९००७ (०९-०४-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि. पालघर) येथील औद्योगिक वसाहतीमधील रस्त्यांची दुरवस्था झाली असून बोईसर ते चिल्हार फाटा येथील वर्षानुवर्षे अपूर्णावस्थेत असलेल्या रस्त्यांच्या कामामुळे आजतागायत शेकडो निष्पाप नागरीकांचे मृत्यू झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीमधील रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय आहे, त्याअनुषंगाने बोईसर-चिल्हार रस्त्या लवकरात लवकर तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर पोलीस घटकातील बोईसर पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रातील बोईसर- चिल्हार रस्त्यावर प्राणघातक अपघात (फेटल) झाल्याबाबतची बोईसर पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल केले असून सन- २०२१ ते फेब्रुवारी, २०२२ पर्यंत १० प्राणघातक अपघात झाल्याची नोंद असून त्यातील बळींची संख्या १३ आहे.
(२) तारापूर औद्योगिक क्षेत्र ११३० हेक्टर क्षेत्रावर विकसीत करण्यात आले असून, मऔवि महामंडळाने ५९ कि.मी. लांबीचे रस्ते विकसीत केले आहेत. सदर रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे मऔवि महामंडळाकडून करण्यात येतात. तारापूर औद्योगिक क्षेत्राला राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पासून जोडणाऱ्या चिल्हार बोईसर १६.५ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी १४ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाव्दारे चौपदरीकरण काम पूर्ण झाले आहे. उर्वरित रस्त्याकरीता संपादन होणाऱ्या वेळगाव, नागझरी व गुंदले येथील काम स्थानिक नागरिक व जमिन मालक विविध मागण्या पुढे करुन, अडथळे आणून काम करु देत नसल्याने काम पूर्ण करण्यास विलंब होत आहे.

सदरहू रस्त्याचे रुंदीकरण पूर्वी संपादित केलेल्या ३० मीटर रुंदीच्या जागेत करीत असल्यामुळे तसेच आपत्कालीन अतिमहत्त्वाचा एकमेव रस्ता असल्याने, अर्धवट काम पूर्ण होणे अत्यंत महत्वाचे आहे. अपूर्ण/ अर्धवट कामामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्धवट काम पूर्ण होणेकामी मऔवि महामंडळातर्फे जिल्हाधिकारी, पालघर यांना सहकार्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

सदर ठिकाणी काम करताना मऔवि महामंडळाकडून रस्ते वाहतुक सुरक्षा व सूचना फलक योग्य ठिकाणी बसविण्यात आलेले आहेत. तसेच योग्य अंतरापासून सुरक्षा कुंपण, रेडियम बोर्ड व चमकदार पट्टयांचा वापर करुन वाहतुकीच्या सुरक्षेच्या दृष्टीने या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

सदर औद्योगिक क्षेत्रातील सर्व रस्ते दुरुस्ती व देखभालीचे कामे वेळोवेळी मऔवि महामंडळाकडून करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुरु केलेले सेमी इंग्रजी वर्ग बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(२४) ३९०४९ (०१-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून पहिलीच्या वर्गापासून सेमी इंग्रजी सुरु करण्यात आले असून जिल्हा परिषदेने येत्या शैक्षणिक सत्रापासून बंद करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थानाही खाजगी शाळेच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत जागतिक स्पर्धेत टिकाव धरता यावा व गरीब विद्यार्थ्यांना इंग्रजीचे शिक्षण मिळावे यास्तव सेमी इंग्रजीचे वर्ग जिल्हा परिषदेने सुरु केलेले होते हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यातील त्रुटी दुर करुन या निर्णयाचा फेर विचार व्हावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधीतांना निवेदन दिलेले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब क्र.१ ते ३ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :**(१) व (२) हे खरे आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून पहिलीच्या वर्गापासून सेमी इंग्रजी सुरू करण्यात आले असून जिल्हा परिषदेने येत्या शैक्षणिक सत्रापासून बंद करण्याचा निर्णय दि. १३ जानेवारी,२०२२ रोजी

झालेल्या बैठकीत घेण्यात आलेला आहे.

(३) जिल्हा परिषद विशेष सर्वसाधारण सभा दि.२७.०१.२०२२ रोजीच्या सभेमध्ये सर्वानुमते सेमी इंग्रजी चालू ठेवण्याबाबत ठराव पारित करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील हिंगणा औद्योगिक क्षेत्रात सीपीटी (कॉमन ट्रीटमेंट प्लान्ट) उभारण्याबाबत

**(२५) ३९३०५ (०९-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक अनेक दशकांपासून विकास शुल्क भरत असतानाही येथील परिसरात सीपीटी (कॉमन ट्रीटमेंट प्लान्ट) आठ वर्षांचा कालावधी होऊनही उभारण्यात आला नसल्याचे दिनांक २६ जानेवारी २०२२ रोजी निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सीटीपी तात्काळ सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (३०-११-२०२२) :** (१) व (२) म.औ.वि.महामंडळाकडून सीईटीपी बांधण्याकरीता हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील पी-१४१ हा भूखंड (२१४८७.५० चौ.मी.क्षेत्रफळ) हिंगणा सीईटीपी इंडस्ट्रीयल को-ऑप.सोसायटी यांना नाममात्र दराने दि.०३.०५.२००७ रोजी उपलब्ध करून देण्यात आला आहे.त्या करीता सोसायटीने पर्यावरण मंजूरी तथा प्रदुषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र प्राप्त केले आहे.

हिंगणा औद्योगिक संघटनेच्या विनंतीनुसार प्रकल्पातील उद्योजकांच्या २५ टक्के सहभागाची रक्कम संघटनेतर्फे प्रस्तावीत सीईटीपी चालविणाऱ्या संस्थेतर्फे गुंतविण्यास म.औ.वि.महामंडळाने मान्यता दिली आहे. प्रस्तावित सीईटीपी

प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल तयार करून त्यास निरी आणि प्रदुषण नियंत्रण मंडळाची मान्यता प्राप्त करणेबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत हिंगणा सीईटीपी इंडस्ट्रीयल को-ऑप. सोसायटी यांना म.औ.वि.महामंडळामार्फत दि.१३.०८.२०२१ रोजी कळविण्यात आले आहे.अद्यापपर्यंत हिंगणा सीईटीपी इंडस्ट्रीयल को-ऑप.सोसायटी कडून प्रकल्प अहवाल अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) येथील गावपाड्यांमध्ये पाणीपुरवठा करणेबाबत

**(२६) ३९६९६ (०९-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) येथील केगांव, चाणजे, करंजपाडा, नवापाडा, सुरकेचापाडा, बापदेवपाडा, साईनगर येथील गावपाड्यातील ग्रामस्थांना सुमारे १६ दिवसातून एकदाच पाणीपुरवठा होत असून येथे मागील ४० वर्षापासून पाणी टंचाईची समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त २० हजार लोकवस्ती असलेल्या गावपाड्यातील ग्रामस्थांना MIDC कडून होत असलेल्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली असल्याने शासनाने पुरेसा पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) :** (१) हे, खरे नाही.
उरण (जि. रायगड) तालुक्यातील मऔवि महामंडळाच्या रानसई धरणाची पाणी साठवण क्षमता १०.०८० दलघमी एवढी आहे.त्यापैकी उपयुक्तसाठा ८.४९० दलघमी एवढाआहे. उपयुक्त पाणीसाठा पावसाळ्या व्यतिरीक्तच्या २४५ दिवसांपैकी फक्त १७५ दिवसांकरीता पुरविण्याजोगा असतो. म्हणजेच दरवर्षी सुमारे ७० ते ८० दिवसांच्या कालावधीकरीता पाणी तुटवडा भासतो
उरण तालुक्यातील (जि. रायगड) केगाव ग्रामपंचायतीस मऔवि महामंडळाकडून सरासरी १९० घमी प्रति दिन पाणीपुरवठा केला जात आहे.
ग्रुप ग्रामपंचायत चाणजे अंतर्गत करंजपाडा, नवापाडा, सुरकेचा पाडा, बापदेव पाडा आणि साईनगरही वस्ती आहे. आजमितीस चाणजे,चाणजे (बालई ),चाणजे (तेलीपाडा ) ग्रामपंचायतीस महामंडळाकडून प्रतीदिन १७५० घ.मी.मंजूर कोट्यापेक्षा जास्त २२७१ घमी प्रति दिन इतका पाणीपुरवठा केला जात आहे.
दरवर्षी माहे जानेवारी ते जुन अखेर पर्यंत रानसई धरणातील पाण्याची उपलब्धता व मागणी यातील तुट लक्षात घेऊन, दर आठवड्यातील मंगळवार व शुक्रवार या दिवशी पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येतो.
(२) रानसई पाणीपुरवठा योजनेवर, वाढीव पाणी पुरवठ्याची निकड लक्षात घेऊन, म औवि महामंडळ, सिडको व नवी मुंबई महानगरपालिका यांच्या दरम्यान बार्टर व्यवस्था (विनिमय वापर) करण्यात आली आहे. त्यानुसार सिडकोने मऔवि महामंडळास १० दललली/दिन पाणी रानसई पाणीपुरवठा योजनेवरील वापर कर्त्याकरीता द्यायचे आहे. मात्र सिडकोकडे अपुरा पाणीपुरवठा असल्याने सध्या त्याऐवजी ३.२०० दललली/दिन पाणी दिले जात आहे. बार्टर (विनिमय वापर) व्यवस्थेमुळे पाणी टंचाईची तीव्रता कमी होण्यास अंशत: मदत होत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगांव) एमआयडीसीला जोडणा-या रस्त्याच्या कामाला मान्यता मिळण्याबाबत

**(२७) ४०१३७ (०९-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूसावळ एमआयडीसीला जोडणारा रस्ता जामनेर रोडवरील डीवायएसपी कार्यालय परिसरात खेडी शिवारातून शिवपूर कन्हाळे वर्ल्ड स्कुल परिसरातून एमआयडीसी भुसावळला जोडणा-या रस्त्याच्या कामाला मान्यता मिळण्यासंदर्भांत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २७ डिसेंबर, २०२१ रोजी लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी रस्त्याला लवकरात लवकर मान्यता मिळून रस्ता पूर्ण करण्याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२९-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भूसावळ एमआयडीसी ला जोडणा-या रस्त्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव यांच्याकडून माहिती मागविली आहे. जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव यांच्या कडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ येथे शिक्षण उपसंचालकांच्या त्रासाला कंटाळून शिक्षकाने आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत**

**(२८) ४०१३९ (०९-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ येथील शिक्षकाने शिक्षण उपसंचालकांच्या त्रासाला कंटाळून श्री. भरत बाबुलाल रेशवाल दिपनगर यांनी दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास आत्महत्येचा प्रयत्न केला याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०६ ऑक्टोबर,२०२१ रोजी मा. मंत्री महोदयांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१) होय
(२) व (३) सदर प्रकरणी आयुक्त (शिक्षण), यांच्या दि.१६.११.२०२१ च्या पत्रान्वये शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्य), संचालनालय यांना सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

---

**जळगांव जिल्ह्यातील शिक्षण विभागात शिक्षण संस्थांमध्ये झालेल्या गैरकारभाराबाबत**

**(२९) ४०६७८ (३०-०३-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील शालेय शिक्षण विभागात तसेच ७ शिक्षण संस्थांमध्ये शालार्थ आयडीची बोगस प्रकरणे व अनियमितता प्रकरणी शासनातर्फे दोन वेळा चौकशी समिती नियुक्त करण्यात येऊनही सदरहू समितीने चौकशीकरण्याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी दोन वेळा चौकशी समिती नेमूनही सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत चौकशी समिती सदस्यांनी केलेला विलंब व याकडे जाणीवपूर्वक केलेल्या दुर्लक्षाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची दखल घेऊन निश्चित वेळेत चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त होऊन दोषींविरुद्ध कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नाशिक विभाग तसेच राज्यामध्ये शालार्थ क्रमांक देताना झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी शिक्षण सहसंचालक (प्राथमिक) यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि. १४/०८/२०२० अन्वये चौकशी समिती गठीत

करण्यात आली होती. तथापि, सदर समितीच्या कामाची व्याप्ती व येणा-या अडचणी विचारात घेऊन शासन निर्णय दि. १.०४.२०२१/शासन शुद्धिपत्रक दि. ०६.०४.२०२१ अन्वये सदर समितीची पुनर्रचना करण्यात आली असून, समितीतील चौकशी अधिकारी यांनी चौकशीचा अहवाल शासनास सादर करावयाचा आहे. त्यानूसार अंशत चौकशी अहवाल शासनास प्राप्त असून, उर्वरीत अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील उचीत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सेवानिवृत्त झालेल्या आयोगाच्या फरकाच्या थकबाकीचा हप्ता मिळणेबाबत

**(३०) ४१७०२ (०९-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त कर्मचारी आर्थिक लाभापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना भविष्यनिर्वाह निधीचा अंतिम परतावा,अर्जित रजारोखीकरण, अंशराशीकरण सारखे लाभ देणे आवश्यक असतानाही ते लाभ देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना खाजगी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी दिलेल्या निवेदनाबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) असल्यास, याबाबत प्रलंबित असलेला सातवा वेतन आयोगाच्या पहिला हप्ता तर इतरांना दुसरा हप्ता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सन २०२०-२१ पासून संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यामुळे प्रत्येक महिन्यांकरिता वेतन व इतर बाबींसाठी आवश्यक असणारा निधी मर्यादित मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. सबब काही जिल्ह्यांमध्ये सातव्या वेतन आयोगाचे हप्ते व इतर देयके अदा करण्यात आलेले नाही. सद्यस्थितीत सदर देयकांसाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील हमाल, माथाडी कामगारांना महागाई निर्देशांकातील फरकाची रक्कम अदा करण्याबाबत

**(३१) ४३५२८ (०९-०४-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभाग शासन निर्णय क्रमांक कंत्राट-१२१६/प्र.क्र.१८४/ना.पु.१६अ, दिनांक ६ जुलै,२०१७ च्या तरतुदीनुसार राज्यातील हमाल, माथाडी कामगारांना महागाई निर्देशांकातील फरकाची रक्कम अदा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यानुसार किती जिल्हयात प्रत्येकी किती निधी वितरीत करण्यात आला तसेच जिल्हा स्तरावर वितरीत केलेल्या निधीचा कोणकोणत्या व किती कामगारांना लाभ देण्यात आला आहे,
(३) असल्यास, या कामगारांना वितरीत केलेल्या निधीपैकी किती रक्कम माथाडी मंडळात लेव्ही म्हणून जमा करण्यात आली व अनेक जिल्ह्यात जिल्हास्तरावर निधी देऊनही कामगारांना लाभ न देण्याची कारणे काय आहेत तसेच परभणी व हिंगोली जिल्हयात या निधीची किती रक्कम प्रलंबित आहे,
(४) असल्यास, याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यात आला आहे.

| जिल्हा | निधी (रु.) | जिल्हा | निधी (रु.) |
|---|---|---|---|
| सातारा | १,०१,५८,०७९/- | परभणी | ३,४०,०९,६१२/- |
| सिंधुदुर्ग | ६०,७३,७६९/- | रत्नागिरी | २,८२,५६,९०५/- |
| अहमदनगर | ४७,४७,२०४/- | गोंदिया | ६४,९५,१०७/- |
| नागपूर | १,४७,५६,१३९/- | हिंगोली | १,४४,९६,४३७/- |
| यवतमाळ | ३५,१०,६९१/- | रायगड | ३४,१७,३५९/- |
| नांदेड | ९,३९,८०,८५८/- | औरंगाबाद | १,४३,३१,८८८/- |
| वर्धा | ५४,८४,२२६/- | भंडारा | ५०,२०,९०६/- |
| अकोला | १,३४,७०,०९२/- | पुणे | २,२७,०६,३३२/- |
| जळगांव | ६७,०६,९९७/- | | |

तसेच,लातूर,कोल्हापूर,अमरावती,सांगली,धुळे,जालना,ठाणे या जिल्हयातील कंत्राटदारांनी सादर केलेल्या नोदणींकृत हमाल कामगारांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार महागाई निर्देशांकानुसार निधी देण्यात आला असल्याचे संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी कळविले आहे.

उर्वरित जिल्हे नाशिक, उस्मानाबाद, गडचिरोली, चंद्रपूर, सोलापूर, वाशिम, बीड, बुलढाणा, नंदूरबार, पालघर येथे हमाल कामगारांना महागाई निर्देशांकानुसार दरवाढ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

जिल्हा स्तरावर वितरीत केलेल्या निधीचा शासकीय धान्य गोदामातील सर्व हमाल कामगारांना लाभ देण्यात आला आहे.

(३) उपरोक्त कामगारांना शासन निर्णय दि.३०.०१.२०१७ नुसार हमाली देयकावर ३० % रक्कम माथाडी मंडळात लेव्ही म्हणून जमा करण्यात आली आहे. बहुतांश जिल्हयांमध्ये कामगारांना लाभ देण्यात आला असून काही जिल्हयांमध्ये तांत्रिक कारणास्तव लाभ देण्यास विलंब झाला होता. तथापि, आता त्या जिल्हयांमध्ये कामगारांना लाभ देण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे. परभणी व हिंगोली जिल्ह्यात निधीची रक्कम प्रलंबित नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रसेवा दलातर्फे शालेय मध्यान्ह भोजन योजना १०० % अनुदानाने कार्यान्वीत करणेबाबत.**

**(३२) ४४६५७ (१७-०९-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी शालेय मध्यान्ह भोजन योजना १०० % अनुदानाने कार्यान्वीत करावी अशी मागणी राष्ट्रसेवा दलातर्फे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणी लक्षात घेता शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे सदर योजनेकरीता निधीचे प्रमाण केंद्र व राज्याकरीता अनुक्रमे ६० :: ४० या प्रमाणात आहे. सदर प्रमाणात केंद्र व राज्य शासनाकडून प्रस्तुत योजनेस मंजूर निधी प्राप्त होत आहे.

---

## राज्यातील जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांच्या प्राथमिक शाळांमध्ये 'शिक्षण अभियान' मोहीम राबविण्यात आल्याबाबत

**(३३) ४४६९३ (१७-०९-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांच्या प्राथमिक शाळांमध्ये पहिलीच्या वर्गात पहिले पाऊल टाकणाऱ्या सुमारे चौदा लाख मुलांची शाळापूर्व तयारी करून घेण्यासाठी माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान तसेच माहे जून, २०२२ अखेरपर्यंत सुमारे ४ लाख माता गटांच्या लोकचळवळीच्या सहभागातून 'शिक्षण अभियान' उपक्रम मोहीम राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपक्रमासाठी केंद्र व राज्य शासनाने माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान शालेय शिक्षण विभागाच्या प्रकल्पासाठी पंधरा कोटी रुपयाची तरतूद केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उपक्रमासाठी एकुण किती अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे व त्याची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शाळा पुर्व तयारी अभियान-पहिले पाऊलबाबत :-

१. एकूण १५.४४ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

२. शाळा पुर्व तयारी अभियान-पहिले पाऊल हा उपक्रम राज्यातील जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांच्या प्राथमिक शाळांमध्ये अंमलबजावणी करण्यात आली आहे.

३. या उपक्रमांअंतर्गत मेळावा आयोजनाबाबत व पुरक साहित्य वापराबाबत प्रशिक्षणे आयोजित करण्यात आली.

४. एप्रिल व जून -२०२२ मध्ये मेळाव्याचे आयोजन करून बालकांची शाळापुर्व तयारी करून घेण्यात आली आहे.

५. बालकांच्या शाळापुर्व तयारी करिता पुस्तिका, कृतीपुस्तिका, विकासपत्र, आयडीया कार्ड असे साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोना काळात पालघर, धुळे, नागपूर, पुणे जिल्हा परिषद शाळांमधील शालेय पोषण आहार बंद असल्याबाबत

**(३४) ४४७१० (२३-०६-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या कोरोना काळात शालेय शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना देण्यात येणारा शिजविलेल्या पोषण आहाराऐवजी कडधान्य स्वरूपातील पोषण आहार पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पालघर, धुळे, नागपूर, पुणे जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार सुमारे आठ महिन्यांपासून बंद असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यात कडधान्यापोटी केवळ ५० टक्केच वाटप करण्यात आले, तसेच पुणे जिल्ह्यात खिचडी शिजविण्यासाठी तेल मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक ठिकाणी पोषण आहाराच्या वितरणासाठी पुरवठादार नेमण्यासंदर्भात प्रशासनाकडून विलंब होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शिक्षण संचालक कार्यालयाने एकूण १० कोटी ६ लाख ८५ हजार मंजुर अनुदानापैकी एकुण ९ कोटी ३९ लाख ८० हजार एवढी रक्कम परत मागविल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१६-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
केंद्र शासनाने करोना काळात शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना कोरडा शिधा वाटप करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार राज्यात योजनेची अंमलबजावणी केली आहे
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
दि. १८ मार्च, २०२१ रोजी शाळांना धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी जिल्हानिहाय पुरवठेदार नियुक्तीसाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेस मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दि.०९ एप्रिल, २०२१ रोजी स्थगिती आदेश दिले होते.सदर स्थगिती आदेशामुळे सन २०२०-२१ मध्ये पुरवठेदार नियुक्त करण्यास विलंब झाला आहे.
(५) प्रस्तुत योजनेकरीता केंद्र शासनाच्या निर्देशानुसार माहे जानेवारी, २०२२ पासून Public Financial Management System (PFMS) प्रणालीमध्ये Single Nodal Account (SNA) उघडण्यात आले आहे.याकरिता सर्व जिल्हे व शाळा यांच्या खात्यावर असलेली अखर्चित रक्कम प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे वर्ग करून सदर खाती शुन्य शिल्लकीची (Zero Balance) करणे आवश्यक असल्याने प्रस्तुत अखर्चित निधी परत मागविण्यात आला होता.तथापि,तदनंतर जिल्ह्यांच्या आवश्यकतेप्रमाणे पी. एफ.एम.एस. प्रणालीव्दारे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुंबई शहर व मुंबई उपनगरे तसेच ठाणे जिल्हातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा कमी झाल्याबाबत**

**(३५) ४४८११ (१७-०९-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक दर्जा घसरल्याचे राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणातून (नॅशनल अचिव्हमेट सर्वे) अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इयत्ता पाचवी, आठवी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांचा गणित, विज्ञान, भाषा, सामाजिक शास्त्र या विषयांची प्रगती योग्य प्रकारे होत नसल्याचे सदर सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विषयांतील विद्यार्थ्यांच्यादृष्टीने सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :**(१) व (२) सदर अहवालात एकंदरीत संपादणूकीमध्ये देशाच्या तुलनेत महाराष्ट्राची सरासरी संपादणूक बहुतांश विषयात जास्त असल्याचे दिसून आले आहे.
(३) व (४) विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याबाबत:-
१. इयत्ता २ री ते १० वी साठी “सेतू अभ्यास राबविण्यात येत आहे.
२. इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी भाषा व गणित विषयासाठी कार्यपुस्तिका, विद्या प्रवेश मार्गदर्शिका, विद्यार्थी कृतीपुस्तिका या अध्ययनाच्या दृढीकरणासाठी सरावाकरिता देण्यात आलेल्या आहेत.

३. राज्यातील पूर्व प्राथमिक ते पाचवी पर्यंतच्या शंभर टक्के विद्यार्थ्यांच्या पायाभूत भाषिक साक्षरता व गणित क्षमता विकसित होण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी अध्ययन साहित्याची निर्मिती करण्यात येत आहे.

राज्य अध्ययन संपादणूक सर्वेक्षण व पायाभूत चाचणी तसेच इयत्ता तिसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक (पाक्षिक) मूल्यांकन चाचणी घेण्याची तजवीज ठेवली आहे.

---

## मुंबईत तसेच पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात रिक्षा चालक जादा भाडे आकारून प्रवाशांची लुट करीत असल्याबाबत

**(३६) ४४९०७ (२९-०६-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :**
सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रिक्षा परवाने देताना रिक्षा मिटरप्रमाणे चालविण्याची अट असताना देखील पनवेल (जि.रायगड) व कल्याण-डोबिवली (जि.ठाणे) येथे रिक्षा चालक मिटर प्रमाणे भाडे न आकारता मनमानी पध्दतीने भाडे आकारुन प्रवाशांची लुट करीत असल्याचे माहे जुन, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे उपप्रादेशिक अधिकारी, परिवहन विभाग यांच्या दुर्लक्षामुळे रिक्षा चालकांवर कारवाई होत नसल्यामुळे रिक्षा चालक मनमानी भाडे आकारून प्रवाशांची फसवणुक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने याकडे दुर्लक्ष करणारे अधिकारी व मनमानी पध्दतीने भाडे आकारणाऱ्या रिक्षा चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३)

माहे एप्रिल,२०२२ ते जून २०२२ या कालावधीत प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,पनवेल यांच्या वायुवेग पथकामार्फत एकूण ३३७ ऑटोरिक्षांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी दोषी आढळलेल्या ८८ वाहनाच्या रिक्षा चालकांकडून मोटार वाहन

कायदयातंर्गत रु. ५५,०००/- इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे. तर उक्त कालावधीत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,कल्याण यांचे मार्फत ९४५ ऑटोरिक्षांची तपासून करण्यात आली असून त्यापैकी दोषी आढळलेल्या ५६० वाहनांच्या रिक्षा चालकांकडून रु.८,९५,५५०/- इतके तडजोड शुल्क , रु.१०,०००/- इतका न्यायालयीन दंड वसूल करण्यात आला असून ०५ ऑटोरिक्षा चालाकांचे परवाने निलंबित तर १३ ऑटोरिक्षा चालकांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आली आहे.

तसेच, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत ऑटोरिक्षांची नियमितपणे तपासणी, ऑटो रिक्षा चालकांचे प्रबोधन व समुपदेशन करणे इ.उपक्रम राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## पुणे शहरात शिक्षण हक्क (RTE) अंतर्गत प्रवेशांमध्ये अडचणी येत असल्याबाबत

**(३७) ४५१४१ (१७-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील शिक्षण हक्क (RTE) अंतर्गत संगणक प्रणालीद्वारे प्रवेश प्रक्रियेमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याची बाब माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवेशाची अंतिम मुदत दिनांक १० मार्च, २०२२ अखेरपर्यंत असल्याने एकुण किती अर्ज प्राप्त झाले आहेत व किती विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर संगणक प्रणालीतील अडचणी दुर करुन विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरळित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात आरटीई २५% प्रवेश प्रक्रियेच्या दरम्यान तांत्रिक अडचण निर्माण झाल्याबाबतची कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) दिनांक १० मार्च, २०२२ अखेर पर्यंत ६२,९६० अर्ज प्राप्त झाले असून ऑक्टोबर, २०२२ पर्यंत १३,४६६ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागात परदेशी विद्यार्थ्यांच्या नावाखाली नियमबाह्य प्रवेश देण्यात आल्याबाबत

**(३८) ४५१९७ (१७-०९-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्या मानसशास्त्र विषय घेऊन पदव्युत्तर शिक्षण घ्यावयाचे झाल्यास पदवी परिक्षेत मानसशास्त्र हा विषय असणे अनिवार्य असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काठमांडु (नेपाळ) येथील कु.मेघा पुरी या विद्यार्थीनीने पुणे विद्यापिठातून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची पदवी घेतल्यानंतर सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी एम.ए मानसशास्त्र अभ्यासक्रमासाठी दिनांक २३ जून, २०२१ रोजी मुंबई विद्यापिठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडे "परदेशी विद्यार्थी" असल्याचे दाखवून विद्यापिठाकडे अर्ज केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कु.मेघा पुरी यांनी पदवीचे शिक्षण पुणे विद्यापिठातून पूर्ण केले असल्यामुळे त्या "परदेशी विद्यार्थी वर्ग" या वर्गवारीच्या निकषात बसत नसतांना तसेच त्याबाबत पात्रता व नाव नोंदणी आणि स्थलांतर विभागाने अपात्र असल्याचे दिनांक २८ जून,२०२२ रोजी कळविले आहे, तसेच तत्कालीन विभागप्रमुख यांनी सदरचा प्रवेश हा नियमबाहय असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने कळवूनही प्रवेश देता यावा म्हणून विद्यापीठ प्रशासनाने त्रिसदस्यीय समिती नेमल्याचे व समितीने सदर विद्यार्थीनीची ऑनलाईन बुध्दीमत्ता चाचणी घेण्याची शिफारस करुन त्याआधारे सदर विद्यार्थीनीला प्रवेश दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांनी मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे तक्रार केल्यानंतर, सदर विद्यार्थीनीचा प्रवेश विद्यापीठाने नाकारला असल्याचेही दिनांक २५ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार एका विद्यार्थीच्या प्रवेशासाठी विद्यापिठाने त्रिसदस्यीय समिती नेमण्या मागील विशेष कारणे काय आहेत या सर्व प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-१२-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.
मुंबई विद्यापीठाच्या उपयोजित मानसशास्त्र व समुपदेशक केंद्राच्या एम. ए. मानसशास्त्र विषयाच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी पदवी शिक्षणामध्ये मानसशास्त्र हा विषय असणे बंधनकारक आहे.
(२) हे खरे आहे.
कु. मेघा पुरी या विद्यार्थिनीने मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडे एम. ए. मानसशास्त्र अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाच्या एकल खिडकी प्रणालीवरील संकेतस्थळावर अर्ज केला होता.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
पात्रता, नावनोंदणी व स्थलांतर विभागाने सदर विद्यार्थिनी अंतिम प्रवेश प्रक्रीयेत पात्र नाही असे कळविल्याने विद्यापीठाने प्रवेश नाकारला आहे.
(५) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे मुंबई विद्यापीठ यांनी कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोमय्या कॉलेज (घाटकोपर),मुंबई मधील एका विद्यार्थिनीने परीक्षेला येणाऱ्या उत्तर पत्रिका लिहूनच परीक्षा केंद्रात गेल्याबाबत

**(३९) ४५२९८ (१७-०९-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटकोपर येथील सोमय्या कॉलेज मधील एका विद्यार्थिनीने परीक्षेला येणाऱ्या उत्तर पत्रिका लिहूनच परीक्षा केंद्रात आणल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय यांची बॅचलर ऑफ सोशल वर्क (डिसेंबर २०-२१ टीईई) ची परीक्षा वेगवेगळ्या परीक्षा केंद्रावर दिनांक ०४ मार्च, २०२२ पासून सुरु असून घाटकोपरच्या के.जे. सोमय्या कॉलेजमध्ये दिनांक १ एप्रिल,२०२२ रोजी इंट्रोडक्शन टू सोशल वर्क या विषयाचा पेपर असतांना सदरचा प्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टीईई परिक्षा दरम्यान घडलेल्या प्रकारानंतर या विद्यार्थींनी विरोधात टिळकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-१२-२०२२) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
के. जे. सोमय्या कला व वाणिज्य महाविद्यालय , मुंबई येथे इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय यांची डिसेंबर २०२२ टिईई ही परीक्षा दिनांक ०४.३.२०२२ ते ११.०४.२०२२ दरम्यान आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेच्या दिनांक २४.०३.२०२२ रोजी एक उत्तरपत्रिका गहाळ झाली असे निदर्शनास आले. याचा शोध घेतला असता दिनांक ०१.०४.२०२२ रोजी सदरची उत्तरपत्रिका मजकूर लिहीलेल्या अवस्थेत दुपारच्या सत्रात बॅचलर ऑफ सोशल वर्क ००१ परीक्षेच्या दरम्यान पर्यवेक्षकास आढळून आली.
सदर प्रकार लक्षात घेता इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय, विभागीय संचालक यांच्या निर्देशानुसार सदर विद्यार्थिनीविरोधात पोलीस ठाणे टिळक नगर येथे दिनांक ०१ एप्रिल, २०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) सदर बाबतीत परीक्षा केंद्र या नात्याने इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय नियमानुसार व अनुषंगिक कायद्यानुसार विनाविलंब कार्यवाही करण्यात आली. या पुढील प्रक्रिया ही इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय यांची जबाबदारी ठरते. हे विश्वविद्यालय केंद्र शासनाच्या अखत्यारीतील विद्यापीठ असून याबाबत शासनाने पुढे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील शालेय पोषण आहार योजनेतील कार्यरत डाटा एन्ट्री ऑपरेटर (आउट सोर्सिंग ) यांना कंत्राटी तत्वावर सामावून घेण्याबाबत**

**(४०) ४६११८ (१७-०९-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत कार्यरत डाटा एन्ट्री ऑपरेटर (आउट सोर्सिंग) यांना कंत्राटी तत्वावर सामावून घेण्याबाबत मा. शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना वारंवार लेखी निवेदन देऊनही शासनाने अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर्स यांच्या नियुक्तीबाबत कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. त्यानुसार त्रयस्थ संस्थेमार्फत नियुक्त डाटा एन्ट्री ऑपरेटर्स यांना कंत्राटी तत्त्वावर सामावून घेता येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भवन्स महाविद्यालयाने प्रथम वर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्यांना मराठीमधून प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देण्यास नकार दिल्याबाबत**

**(४१) ४६१६२ (१७-०९-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर्व संलग्न महाविद्यालयांनी त्यांच्या नावाचे फलक मराठी भाषेमध्ये लावावेत असे आदेश मुंबई विद्यापीठाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाने मराठी भाषेमध्ये नावाचे फलक लावण्याचे आदेश देऊनही भारतीय विद्या भवनचे गिरगाव चौपाटी येथील हजारीमल सोमाणी महाविद्यालयाने (भवन्स महाविद्यालय) प्रथम वर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्यांना मराठीमधून प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देण्यास नकार दिला असल्याची बाब दिनांक ०६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यास्तव कला शाखेतील विद्यार्थ्यांना इंग्रजीमधील प्रश्न समजून घेऊन उत्तरे लिहिण्यात अडचणी येऊन त्याचा परिणाम त्यांच्या गुणांवर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन तसेच मराठी भाषेतून फलक लावण्याचे आदेश देणाऱ्या विद्यापीठाने विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका मराठीमध्ये उपलब्ध करुन देण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हजारीमल सोमानी महाविद्यालयांचे (भवन्स) मध्ये विद्यार्थ्यांना केवळ इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिल्या जातात अशी तक्रार एप्रिल, २०२२ च्या परीक्षेसाठी मुंबई विद्यापीठाकडे प्राप्त झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

हजारीमल सोमानी महाविद्यालयांचे (भवन्स महाविद्यालय) सूचनांचे माध्यम इंग्रजी आहे. त्यामुळे अध्यापनाचे शिक्षण व मूल्यमापन इंग्रजी माध्यमात केले जाणे अपेक्षित आहे. तरी, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यार्थ्यांना मराठीमध्ये प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी परवानगी दिलेली आहे. तसेच परिक्षेच्या दिवशी प्राध्यापकांनी मराठी भाषांतरासाठी विद्यार्थ्यांना मदत केली आहे.

(४) हे खरे आहे.
त्यानुसार मुंबई विद्यापीठाने दिनांक २८.०६.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये तशा सूचना सर्व संलग्नित महाविद्यालयांना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील पदवी प्रमाणपत्रातील चुकांबाबत

**(४२) ४६२५२ (१७-०९-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कु.प्रीतम पांडुरंग भांदूगरे या विद्यार्थीने दिनांक २९ मार्च २०२२ रोजी वा त्या सुमारास पदवी प्रमाणपत्रातील चुका दुरुस्ती करीता अर्ज केला होता हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या विद्यार्थीनीस पदवी प्रमाणात चुका दुरुस्ती करीता तीन ते चार वेळा विद्यापिठात जावे लागले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यास्तव अनेक विद्यार्थांना पदवी प्रमाणपत्रातील चुकांमुळे त्रास सहन करावा लागत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांवरील तपशील अचूक यावा या हेतूने, तपशील संबंधित विद्यार्थ्यांना तसेच संबंधित महाविद्यालयांना पडताळणी करिता ऑनलाइन उपलब्ध करून दिला जातो. सुचविण्यात आलेल्या सुधारणा तपशीलात समाविष्ट करूनच पदवी प्रमाणपत्र छपाईसाठी पाठविला जातो.
विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र सुपूर्त केल्यानंतरही तपशीलमध्ये काही त्रुटी आढळून आल्यास विद्यार्थी ते प्रमाणपत्र विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे सुधारणा करणेकरिता जमा करतात. साधारणतः १० ते १२ दिवसात सुधारणा करून पदवी प्रमाणपत्र विद्यार्थ्यास सुपूर्त केले जाते.
(४) वरील कार्यपद्धतीनुसार कु. प्रीतम भांदुगरे यांनी सुधारीत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला असता त्यांना सुधारीत पदवी प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे विद्यापीठाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोनामुळे ऑनलाईन शाळा झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा खालावल्याबाबत

**(४३) ४६८५० (१७-०९-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनामुळे शाळा ऑनलाईन झाल्याने गत २ वर्षांमध्ये शासकीय शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना लिहिता-वाचता येत देखील नसल्याचे दिनांक १५ मे, २०२२ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांना ऑनलाईनसाठी आवश्यक सुविधा नसल्यामुळे तसेच शिक्षकांना ऑनलाईन शिक्षणाचे प्रशिक्षण नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :**(१) व (२)  हे खरे नाही
(३) व (४) प्रश्न उद्धभवत नाही.

---

## पनवेल (जि. रायगड) तालुक्यातील आदिवासी वाडयांमध्ये विंधन विहीरींच्या प्रलंबित कामांमुळे पाणी टंचाई निर्माण होत असल्याबाबत

**(४४) ४७१११ (२९-०६-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि. रायगड) तालुक्यातील आदिवासी वाडयांमध्ये विंधन विहीरींच्या कामांना मंजूरी न मिळाल्यामुळे दरवर्षी आदिवासी बांधवांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे जुन, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित पाणी पुरवठा विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे विंधन विहीरींचा प्रस्ताव प्रलंबित असून सन २०२१ मध्ये उक्त तालुक्यातील १० आदिवासी वाडयांचा विंधन विहीरींचा प्रस्ताव मंजूर होऊनसुध्दा विंधन विहीरी खोदण्याच्या कामाला अद्यापपर्यंत सुरूवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर कारवाई करुन प्रस्तावित विंधन विहीरींच्या कामाला सुरूवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१२-०८-२०२२) :** (१) व (२)  अशंत: खरे आहे

पाणी टंचाई अंतर्गत नवीन विंधन विहिरी खोदाई उपाययोजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, त्या दरम्यान मान्सुन सुरु झाल्यामुळे प्रत्यक्षात कार्यवाही होऊ शकली नाही.
३) सदर वाडयांचा समावेश पुढील संभाव्य पिण्याचे पाणी टंचाई कृती आराखडयामध्ये करुन प्राधान्याने पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

तसेच सद्य:स्थितीत सदर वाड्यांना लघु नळ पाणी पुरवठा योजनांद्वारे व विंधन विहीरीवरील हातपंपाद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यात धानाच्या बोनसची रक्कम शेतक-यांना मिळाली नसल्याबाबत

**(४५) ४७३८७ (२९-०६-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात शासकीय आधारभूत हमी भाव केंद्रावर सन २०२१-२०२२ या कालावधीत रु १९४० प्रति क्विंटल या भावाने खरेदी केलेल्या ५ लाख ३८ हजार २६९ क्विंटल धानाच्या बोनसची रक्कम अद्यापही शेतकऱ्यांना मिळाली नसल्याचे माहे जून,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बोनसची रक्कम शेतकऱ्यांना त्वरीत अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१२-०८-२०२२) :** (१) व (२) पणन हंगाम २०२१-२२ मध्ये केंद्र शासनाने धानासाठी निश्चित केलेल्या रु.१९४०/- प्रतिक्विंटल इतक्या हमीभावाने शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात येऊन शेतकऱ्यांना देय असलेले चुकारे अदा करण्यात आले आहेत.

पणन हंगाम २०२१-२२ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर राशी देण्याबाबत लोकप्रनिधींकडून शासनास मागणी प्राप्त आहे. त्यानुषंगाने कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापुर (जि.बुलढाणा) येथे नाबार्ड अंतर्गत धान्य गोडाऊन बांधकामास मंजूरी देऊन निधी मिळण्याबाबत**

**(४६) ४७७६८ (१६-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापुर (जि.बुलढाणा) येथे नाबार्ड अंतर्गत ३,००० मेट्रीक टन धान्य गोडाऊन बांधकामास प्रशासकिय मंजुरी देवून निधी मिळणेबाबतचे मलकापुरचे लोकप्रतिनिधी यांनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना दि.०२ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-११-२०२२) :** (१) होय.

(२) सद्यस्थितीत मलकापूर तालुक्याचे नियतन ७७० मे.टन इतके आहे. त्यानुषंगाने मलकापूर तालुक्यात १००० मे.टन धान्य साठविण्याची क्षमता असलेले गोदाम उपलब्ध आहेत.

त्यामुळे सद्यस्थितीत मलकापुर (जि.बुलढाणा) येथे गोदाम बांधकाम करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण तसेच विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने नामांकित संस्थांसमवेत करार केल्याबाबत.**

**(४७) ४७९३९ (१७-०९-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण तसेच विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) नामांकित संस्थांसमवेत करार करून पहिल्या टप्प्यात राज्यातील ४८८ आदर्श शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने दिनांक ०५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी जिल्हा पातळीवर शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच एकुण किती रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१) होय,

(२) गुणवत्ता व आर्थिक तरतूदीबाबत:-

१. परिस्थितीजन्य अभ्यास राबविण्यात येत आहे.

२. आदर्शशाळा गुणवत्ता विकास आराखडा तयार करण्यात आला आहे.

३. गुगल क्लासरूम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

४. ८ वी तें १२ वी च्या विद्यार्थिंनी साठी नवउद्यमशीलतेस प्रोत्साहन करण्यासाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

५. ऑरो शिष्यवृत्ती कार्यक्रम राबविण्यात आला आहे.
सर्व उपक्रम सीएसआर/स्वयंसेवी संस्थांसोबत राबविण्यात येणार असून शासनावर कोणताही आर्थिक भार येणार नाही अशा स्वरूपाचा सामंजस्य करार करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## सई, पालघर, डहाणू, तलासरी, वाडा, विक्रमगढ, जव्हार व मोखाडा आदि आदिवासी भागातील इयत्ता दहावी व बारावीच्या तेरा हजार विद्यार्थ्यांनी परिक्षा न दिल्याबाबत

**(४८) ४७९७१ (१७-०९-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई, पालघर, डहाणू, तलासरी, वाडा, विक्रमगड जव्हार व मोखाडा आदि आदिवासी भागातील इयत्ता दहावी व बारावी परिक्षांचे अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे तेरा हजार विद्यार्थी बेरोजगारी व बिकट आर्थिक परिस्थितीमुळे परिक्षा देऊ न शकल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण संपुष्टात आल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कवडजई (ता.बल्लारपूर,जि.चंद्रपूर) येथील शाळेत शालेय पोषण आहारात प्लास्टीकचा तांदूळ आढळून आल्याबाबत

**(४९) ४८१०९ (२०-०९-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कवडजई (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील जिल्हापरिषद उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात वाटप करण्यात आलेल्या तांदुळात प्लास्टीकचे तांदूळ मिसळले असल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तांदुळ खाल्यास बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल यामुळे पालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) व २) हे खरे नाही.
केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सुक्ष्म पोषक तत्त्वांची कमतरता भरुन काढण्याकरीता दर्जावर्धित (Fortified) मिश्रित तांदूळ वापरण्यात येतो. सदर तांदूळ नियमित तांदळापेक्षा कमी वजनाचा व पिवळसर रंगाचा असल्याने तो प्लॉस्टिकचा असल्याबाबत गैरसमज पसरत आहे. याबाबतचे स्पष्टीकरण व माहिती प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दि.०४/०८/२०२१ रोजीच्या पत्राव्दारे सर्व शाळांना दिली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सोईसुविधा पुरविण्याबाबत

**(५०) ४८१९३ (२३-०९-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्व तालुक्यामध्ये पालकांनी आपल्या मुलांना खाजगी शाळेत दाखल न करता जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतले असून ही संख्या सुमारे ३००० हजार एवढी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या शाळांमध्ये गुणवत्ता, खाजगी शाळांप्रमाणे सोई सुविधा, वह्या, पुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन इत्यादी सोईसुविधा पुरविण्याची मागणी येथील विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये खाजगी शाळेमधून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये एकूण ८७०८ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

शासन नियमानुसार सर्व पात्र लाभार्थ्यांना शासन योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.